Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue – I January – February 2024

# आजच्या आधुनिक युगात ग्रंथालयीन विम्याची आवश्यकता: अभ्यास

**डॉ. संध्या पगारे**
*ग्रंथपाल, हशू अडवाणी विशेष महाविद्यालय,*
*चेंबूर, मुंबई ४०००७४*

**सौ. श्रेया सारंग**
*M.Lib. विद्यार्थिनी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र*
*मुक्त विद्यापीठ.*

***सारांश :***

***नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींमुळे जीवित आणि भौतिक पायाभूत सुविधांचे नुकसान तर होतेच पण त्याचबरोबर माहितीच्या पायाभूत सुविधांचेही म्हणजेच ग्रंथालयांचेही नुकसान होते. जेव्हा एखाद्या प्रदेशामध्ये आपत्तकालीन परिस्थिती निर्माण होते तेव्हा शैक्षणिक आणि वैज्ञनिक संशोधनासाठी लागणारी महत्वाची माहिती नष्ट होते. या आपत्तीमुळे ग्रंथालयीन इमारतीचे, फर्निचरचे, उपकरणांचे आणि शेल्व्हिंगचे नुकसान होते. त्याचबरोबर अनेक वर्षांपासून जपून ठेवलेल्या दुर्मिळ मौल्यवान साहित्य संग्रहाचे नुकसान होते. त्यामुळे ग्रंथालयातील वाचकांना असे दुर्मिळ साहित्य वाचनासाठी मिळत नाही. आपत्तीचे शारीरिक, आर्थिक, बौद्धिक आणि भावनिक परिणाम अत्यंत हानीकारक असतात. त्यासाठी ग्रंथालयांनी ग्रंथालयीन विमा काढणे आवश्यक आहे. योग्य ग्रंथालयीन विमा काढण्यासाठी ग्रंथपाल, संस्था चालक यांनी विमा मध्यस्थांकडून तज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. ग्रंथालयीन विमा काढताना सामान्यतः ग्रंथालयीन इमारत, पुस्तके, मालमत्ता, वैयक्तिक अपघात या विविध गोष्टींचा विचार करून त्यानुसार विमा काढणे आवश्यक आहे. ग्रंथालय इमारतीचा विमा, आगीचा विमा, ग्रंथालयीन स्टॉक चा विमा या प्रकारच्या विम्याचा समावेश ग्रंथालयीन विम्या मध्ये होतो. 'भारत सुक्ष्म उद्यम सुरक्षा' या विम्यांतर्गत ग्रंथालयांना विमा देता येतो.***

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**शोध संज्ञा:** ग्रंथालय, विमा, सुरक्षा, आपत्ती, आपत्ती व्यवस्थापन

## १. प्रस्तावना :

ग्रंथालय आपला सांस्कृतिक वारसा जतन करते. हा सांस्कृतिक वारसा पुढील पिढीला प्रदान करण्याचे महत्वाचे कार्य ग्रंथालये करत असतात. ग्रंथालयातील हस्तलिखिते, पुस्तके, दुर्मिळ साहित्य, कलाकृती देशाच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक वारशाचे प्रतिनिधित्व करतात. शिक्षण, संशोधन, माहिती संप्रेषण या सर्व गोष्टींसाठी ग्रंथालये महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यामुळे माहितीच्या या पायाभूत घटकाकडे म्हणजेच ग्रंथालयांकडे कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष करून चालणार नाही. या ग्रंथालयीन संपत्तीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याचे गंभीर परिणाम राष्ट्राला भोगावे लागतील. त्यामुळे भूकंप, आग, युद्ध, बॉम्ब स्फोट, पूर यासारख्या आपत्तीपासून ग्रंथालयाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. या आपत्तीपासून ग्रंथालयांनी

संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी ग्रंथपाल, संस्था चालक यांनी उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी ग्रंथालयीन विम्याच्या माध्यमातून ग्रंथालय साधनसंपत्तीचे संरक्षण होऊ शकते. यासाठी ग्रंथपाल आणि संस्थाचालक यांनी विमा कंपनीशी संवाद साधून तज्ज्ञांच्या मदतीने ग्रंथालय साधनसंपत्तीचे योग्य विमा धोरण अवलंबिले पाहिजे. यातून ग्रंथालयीन साधनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन करता येईल. तसेच ग्रंथालयाचा विकास साधता येईल.

**२. संशोधनाची उद्दिष्टे :**

१) ग्रंथालय विम्याचे महत्व मांडणे.

२) ग्रंथालयासाठी उपलब्ध असलेल्या विमा पॉलिसीची माहिती पुरविणे.

**३. संशोधनाची पद्धती :**

सदर संशोधनात संशोधकांनी वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरलेली आहे. ग्रंथालयीन विम्याच्या बाबतीत संशोधन करताना संशोधकांनी संशोधन विषयाशी पूर्वाभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या संशोधकांनी केलेल्या संशोधनाचा अभ्यास केला आहे. विविध विम्या कंपन्यांच्या संकेतस्थळावर जाऊन विविध विमा धोरणाबाबत माहिती मिळविलेली आहे. विविध पुस्तके, विविध लेख, वर्तमापत्रातील लेख, प्रबंध यांचा अभ्यास संशोधकांनी केला आहे.

**४. पूर्वाभ्यासाचे समायोजन :**

E. Ademola Adekanye (२०११) यांच्या मते राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रंथालये आणि ग्रंथपालांची भूमिका बदलत असल्याने, चांगले विमा संरक्षण असणे आवश्यक आहे. नायजेरियन युनिव्हर्सिटी लायब्ररीमध्ये ई-लायब्ररी असल्यामुळे अशा लायब्ररीचा विमा काढणे अत्यावश्यक होते. विद्यापीठाच्या ग्रंथपालांनी विद्यापीठ प्रशासनाला साहित्याचे नुकसान, व्यवसायात व्यत्यय, वैयक्तिक अपघात आणि मोटार वाहन प्रवास यापासून वाचण्यासाठी विमा उतरवण्यास पटवून द्यावे.

प्रत्येक लायब्ररीमध्ये सुरक्षा उपाय आणि आकस्मिक योजना असणे आवश्यक आहे. ग्रंथालय आणि त्यातील साहित्यासाठी चांगले विमा संरक्षण विकसित करण्यात ग्रंथपाल, विमा एजंट आणि विद्यापीठ यांचा सहभाग असावा. समाजातील नाकारात्मक पैलूंपासून ग्रंथालय स्वतःला वाचवू शकत नाही त्यामुळे ग्रंथपालांनी सुरक्षिततेचे वातावरण तयार केले पाहिजे.

कोणत्याही विमा कंपनी किंवा ब्रोकरने ग्रंथालयीन विमा संरक्षण घेण्यासाठी ग्रंथालय आपत्ती नियंत्रण नियोजनावर भर दिला आहे. यांच्या मते ग्रंथालयांसाठी विमा संरक्षण अंतर्दृष्टी प्रदान करते. विमा संरक्षणाची व्यवस्था करताना आवश्यक असलेल्या विचारावर ते भर देतात. विमा कार्यक्रम अजूनही ग्रंथालयाच्या गरजा पूर्ण करतो याची खात्री करण्यासाठी नियमितपणे पुनरावलोकन केले पाहिजे. ग्रंथालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिळू शकणारे काही फायदे सूचीबद्ध करतात. उदा. जीवन विमा, आरोग्य आणि अपंगत्व विमा, इ. (Adekanye, 2011).

**५. विमा, विम्याचा इतिहास व विम्याचे प्रकार :**

विमा म्हणजे आर्थिक नुकसानापासून संरक्षण करण्याचे एक साधन आहे. एखाद्या आकस्मित नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानातून बाहेर येण्यासाठी विमा सरंक्षण बहुमूल्य सहकार्य करते. विमा हा दोन व्यक्तींमधील कायदेशीर करार आहे. त्या व्यक्ती म्हणजे विमा काढणारी व्यक्ती आणि विमा कंपनी.

इ. स. पूर्व २००० वर्षापासून चीनी आणि बॅबिलोनियन संस्कृतीमधील व्यापाऱ्यांनी सर्वात पहिल्यांदा विमा पद्धत सुरू केली. भारतात विम्याचा उद्योग इ.स. १८१८ मध्ये अनिता भावसार या व्यक्तीने सुरू केला. १९९९ मध्ये संसदेने विमा नियामक आणि विकास प्राधिकरण कायदा मंजूर केला. Insurance Regulatory Development ऑथॉरिटी आता विमा क्षेत्रावर राज्य करत आहे आणि नवीन विमा कंपन्यांना परवाना देत आहे. परिणामी विम्याच्या माहितीची मागणी वाढत आहे (साने, गोळे, २००१).

या विम्याचे आयुर्विमा, अपघात विमा, गृहकर्ज विमा, आरोग्य विमा, वाहन विमा, पीक विमा, प्रवास विमा, अग्नी विमा, इमारत विमा बरेच प्रकार आहेत.

**६. ग्रंथालयीन विमा**

आग, भूकंप, पूर यासारख्या नैसर्गीक आपत्तीमुळे ग्रंथालयाची इमारत, ग्रंथालयातील साहित्याचे नुकसान झाल्यास ग्रंथालय विम्याच्या मदतीने विमा कंपनी आपल्या अटी व शर्थीनुसार या नुकसानाची भरपाई करून देते. सर्व सांस्कृतिक संस्थांनी त्यांच्या इमारती, सामग्री आणि संग्रहांचा विमा उतरवला पाहिजे. एखाद्या संस्थेने इमारतीमध्ये जागा भाड्याने दिली असली तरी, त्याचा विमा असणे आवश्यक आहे. भाडेकरूचा विमा इमारतीच्या आतील भागासह दुय्यम नुकसान आणि सामग्री कव्हर करतो. प्रत्येक विमा पॉलिसी कलेक्शन वेगळ्या पद्धतीने कव्हर करते. कलाकृती आणि दुर्मिळ पुस्तके यासारख्या संग्रहातील काही भाग कव्हर करण्यासाठी विमा पॉलीसी खरेदी केली जाऊ शकते. जेव्हा गरज असेल तेव्हा अतिरिक्त अल्प-मुदतीचे विमा पॉलीसी खरेदी केल्या पाहिजेत. सर्व विमा पॉलिसींना त्यांच्या कव्हरेजवर मर्यादा असतात.

ग्रंथालयासाठी विमा संरक्षणामध्ये सामान्यतः ग्रंथालयीन इमारत, ग्रंथालयातील स्टॉक, आग, चोरी, साहित्याचे नुकसान, व्यवसायात व्यत्यय, वैयक्तिक अपघात यांचा समावेश असतो.

**६.१ ग्रंथालयीन इमारत, मालमत्ता :**

ग्रंथालयाच्या इमारतीच्या भौतिक अखंडतेचे रक्षण करताना आगीपासून ते पुरापर्यंतच्या सर्व आपत्त्यांपासून संरक्षण करण्यासाठी इमारतीचा विमा काढणे आवश्यक आहे. या विमाकरारामधील विमा मूल्य निश्चित करताना वाढत जाणाऱ्या महागाईचा विचार करणे आवश्यक आहे. या प्रकारचा विमा घेताना ग्रंथालयांनी मालमत्तेची भविष्यातील किंमत आणि वास्तविक रोख मूल्य या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान (ICT) उपकरणे जसे की संगणक, दूरसंचार सुविधा इत्यादी, ग्रंथालयामधील महत्वाचे घटक आहेत. या विशेष ICT उपकरणांच्या कव्हरेजची मागणी करणे महत्वाचे आहे. हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरसाठी बॅकअप खरेदी करण्यासाठी आणि महत्त्वाच्या डेटाच्या पुनर्प्राप्तीसाठी या

उपकरणांना विमा संरक्षण असणे आवश्यक असते. फर्निचर, शेल्व्हिंग, टायपरायटर आणि फोटोकॉपीअर यांसारख्या सर्व ग्रंथालयीन सामग्रीसाठीदेखील विमा संरक्षण असणे आवश्यक आहे. झीज, हेतुपुरस्सर नाश किंवा आग किंवा पूर यासारख्या घटनांमुळे या मालमत्तेचे नुकसान होऊ शकते. यापैकी कोणत्याही परिस्थितीत, मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची दुरुस्ती किंवा पुनर्स्थापनेचा खर्च विमा पॉलिसीमध्ये समाविष्ट केला पाहिजे. त्याचबरोबर ग्रंथालयात जेव्हा चोरी होते तेव्हा प्रवेश करताना तसेच चोरी करून बाहेर पडताना ग्रंथालयाचे व परिसराचे बरेच नुकसान करतो. ग्रंथालयातील वस्तूंची चोरी करतो, कुलुपे तोडतो. या सर्व गोष्टींपासून आर्थिक संरक्षण मिळविण्यासाठी ग्रंथालयांनी चोरी विमा काढणे आवश्यक आहे. चोरी विम्यामुळे चोरीच्या नुकसानीचा धोका कमी होईल. ग्रंथालयामध्ये होणाऱ्या अपघातामुळे ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना शारीरिक हानी पोहचू शकते. अशावेळी ग्रंथालय विमा पॉलिसीमध्ये शारीरिक हानीसाठी संरक्षण समाविष्ट केले पाहिजे. ग्रंथालयामधील एखादी व्यक्ती जखमी झाल्यास, ग्रंथालय संचालकाला कायदेशीररित्या जबाबदार धरले जाऊ शकते. या शारीरिक दुखापतीसाठी ग्रंथालय जबाबदार नसले तरीही खर्च वाढू शकतो. त्यामुळे या कव्हरेजमध्ये शारीरिक हानी समाविष्ट करून अशा दाव्यांपासून स्वतःचे संरक्षण करता येईल (Adekanye, 2011).

**६.२ पुस्तके :**

ग्रंथालयातील वाचनसाहित्य हे प्रत्येक ग्रंथालयाचे जीवन असते. ग्रंथालयामध्ये हजारो पुस्तके असू शकतात, या साहित्यसंग्रहाची किंमत खूप जास्त असू शकते. याबरोबरच ग्रंथालयामध्ये बरीच दुर्मिळ वाचनसाहित्य उपलब्ध असते. या विशाल मालमत्तेचे संरक्षण केले जावे, म्हणूनच ग्रंथालय विमा पॉलिसीमध्ये सामान्यतः पुस्तके समाविष्ट केली जातात.

**६.३ आगीचा विमा :**

ग्रंथालयामध्ये आग लागल्यामुळे ग्रंथालय सामग्रीचे नुकसान झाल्यास त्याचे आगीच्या विम्यामार्फत कव्हरेज मिळते.

**६.७ ग्रंथालयीन वाहनांचा विमा :**

ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांकडून अधिकृत वापरासाठी पुस्तकांची वाहतूक करण्यापासून, व्यावसायिक वाहनांना सुरक्षितता देणे आवश्यक आहे. या प्रकारचा ऑटो इन्शुरन्स लायब्ररी व्हॅन आणि लायब्ररीच्या मालकीच्या आणि लायब्ररी व्यवसायात वापरल्या जाणाऱ्या अधिकृत कार यासारख्या वाहनांचे संरक्षण करू शकतो.

**७. ग्रंथालयीन विम्याची आवश्यकता**

ग्रंथालयामध्ये वाचन साहित्यासोबतच जुन्या हस्तलिखितांचा, जुन्या साहित्यसंग्रहाची जपणूक केली जाते. प्रत्येक सार्वजनिक किंवा खाजगी ग्रंथालयाकडे ग्रंथालयांनी मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी ग्रंथालयीन विमा असणे आवश्यक आहे. प्रत्येक ग्रंथालयाने विमा पॉलिसी काढावी ज्यात त्यांचे संग्रह आणि त्यांच्या इमारतींमधील इतर सामग्री समाविष्ट असेल. जेणेकरून आपत्तीजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा

फायदा त्या ग्रंथालयाला होऊ शकतो. ग्रंथालयीन विम्यामध्ये ग्रंथालयाची इमारत, ग्रंथालयातील पुस्तके, फर्निचर आणि उपकरणे यासह सर्व भौतिक वस्तूंचा समावेश होतो.

- ग्रंथालयामध्ये बरीच दुर्मिळ पुस्तके, ग्रंथ असतात. ग्रंथालयीन आपत्तीमुळे असे दुर्मिळ ग्रंथांचे नुकसान होऊ शकतात. या विशालतेच्या मालमत्तेचे संरक्षण केले जावे, म्हणूनच ग्रंथालय विम्याची आवश्यकता आहे.
- ग्रंथालयीन फर्निचर, शेल्व्हिंग आणि कॉम्प्युटर यासारख्या भौतिक संपत्तीचेही नुकसान होण्याची शक्यता असते. या भौतिक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी ग्रंथालयीन विम्याची आवश्यकता आहे.
- भूकंपामुळे ग्रंथालयीन इमारतींना धक्का पोहोचतो, इमारती कोसळतात. या इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी बराच खर्च होतो. इमारतीचा विमा काढल्यामुळे विम्याद्वारे या नुकसानाची भरपाई केली जाते त्यामुळे ग्रंथालयीन इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी विमा आवश्यक असतो.
- ग्रंथालयीन आपत्तीमुळे ग्रंथालयाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. या नुकसानाची भरपाई मिळविण्यासाठी ग्रंथालयीन विमा आवश्यक आहे.
- ग्रंथालयीन विमा आर्थिक सहाय्य व संरक्षण प्रदान करतो.
- प्रीमियम गोळा करून निधी निर्माण होतो. हा फंड सरकारकडे किंवा स्टॉकमध्ये गुंतवला जातो. हा निधी देशाच्या आद्योगिक विकासासाठी वापरण्यात येतो. यामुळे रोजगाराच्या संधी वाढतात.

**८. ग्रंथालयीन आपत्ती:**

नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींमुळे त्या विशिष्ट प्रदेशातील ग्रंथालयावर आपत्तकालीन परिस्थिती निर्माण झालेली दिसून येते. या आपत्तींमुळे ग्रंथालय संसाधनांचे नुकसान होते आणि ग्रंथालय सेवा विस्कळीत होतात. ग्रंथालयांचे नुकसान हे देशाच्या माहितीच्या पायाभूत सुविधांचे नुकसान आहे. ग्रंथालयीन आपत्तींमुळे वैज्ञानिक आणि शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक असलेली बरीच मौल्यवान माहिती नष्ट होते. ग्रंथालयीन आपत्तीसाठी पुढील घटक कारणीभूत ठरतात.

**८.१ पाणी :**

मुसळधार पाऊस, चक्रीवादळे, पुर ग्रंथालयाचा साहित्य संग्रह नष्ट करतात. या नैसर्गिक कारणांव्यतिरिक्त ड्रेनेज पाईप्समधून पाणी ग्रंथालयात येऊ शकते किंवा भिंती, तुटलेल्या खिडक्या, दरवाजे किंवा अगदी जमिनीतूनही गळती होऊ शकते. शिवाय, आग लागलेली असताना ती विझविण्यासाठी पाणी शिंपडणे आणि अग्निशामक उपकरणे सक्रिय करण्यासाठी पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर करणे आवश्यक आहे, ज्यामुळे ग्रंथालयातील पुस्तकांचे प्रचंड नुकसान होते. पाण्यामुळे जवळजवळ ग्रंथालयातील बऱ्याचशा साहित्याचे नुकसान होते. या नुकसानाची व्याप्ती पाणी ग्रंथालयामध्ये किती वेळ राहते यावर अवलंबून असते. पाण्याच्या संपर्कात आल्यावर काही प्रिंट्स आणि साहित्य मऊ होतात आणि लगतच्या पृष्ठभागावर चिकटतात. पाण्यामुळे शाई आणि रंगांचा रक्तस्त्राव होऊ शकतो ज्यामुळे मजकूर किंवा चित्रे अस्पष्ट दिसू शकतात. पाण्यामुळे पुस्तकांच्या बांधणीचे मोठे नुकसान होऊ शकते. ओल्या कागदामुळे बुरशी आकर्षित

होण्याची शक्यता असते ज्यामुळे नुकसान वाढते.

**८.२ भूकंप :**

भूकंपामुळे ग्रंथालय असलेल्या इमारतीचे नुकसान होते, याचा परिणाम पुस्तकांवर होतो. उच्च तीव्रतेच्या भूकंपामुळे इमारत कोसळून पुस्तके ढिगाऱ्यांमध्ये गाडली जातात. अर्ध्या तुटलेल्या इमारतींमुळे वाचनालयाचा संग्रह उघड्यावर पडतो. अशा परिस्थितीत लूटमार आणि चोरीच्या घटना वारंवार घडतात त्यामुळे पुस्तकांचे नुकसान होते.

**८.३ आग :**

ग्रंथालयांसमोरील आणखी मोठी आपत्ती म्हणजे शॉर्ट सर्किटमुळे किंवा निष्काळजीपणामुळे लागलेली आग. एखादे वेळी ही आग एखाद्या राष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास आणि ओळख खराब करण्यासाठी हेतुपुरस्सर लावली जाऊ शकते. ग्रंथालयीन संसाधने बहुतेकदा कागदावर किंवा फिल्मवर असतात, तर ग्रंथालयातील फर्निचर बहुतेकदा लाकडी असते. हे सर्व पदार्थ ज्वलनशील आहेत. लगतच्या आवारात लागलेली आग ग्रंथालयात सहज पसरू शकते. आगीमुळे पुस्तके आणि इतर संसाधनांचे नुकसान होऊ शकते आणि राख होऊ शकते. आगीचा धूर व काजळी यांचा परिणाम ग्रंथालयातील इतर संग्रहावर होतो. शिवाय आग प्रतिबंधक आणि अग्निशमन पद्धती देखील सामग्रीचे नुकसान वाढवतात.

**८.४ युद्ध, दंगल, बॉम्ब स्फोट आणि तोडफोड :**

युद्ध, दंगल, बॉम्ब स्फोट आणि तोडफोड यांमुळे ग्रंथालयीन संपत्तीचे, पुस्तकांचे नुकसान होते. ग्रंथालयाची लूट, युद्धकाळात ग्रंथालयांचे संग्रह जाळणे, दहशतवादी हल्ले, राजकीय कारणांसाठी ग्रंथालयाचा संग्रह नष्ट करणे अशा घटनादेखील घडत असतात. त्यामुळे ग्रंथालयांचे मोठे नुकसान होते

**९. आपत्तींमुळे ग्रंथालयांचे झालेले नुकसान:**

- २०१५ च्या भूकंपात नेपाळमधील कैसर लायब्ररी, नेपाळ नॅशनल लायब्ररी, मदन पुरस्कार पुस्तकालय या तीन सर्वात मोठ्या सार्वजनिक ग्रंथालयांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते (सिजापती, २०१९).
- इटलीतील फ्लॉरेन्स शहरात दि. ४ नोव्हेंबर, १९६६ रोजी पहाटेच्या वेळी अर्नो नदीला आलेल्या पुरामुळे शहरातील जवळपास प्रत्येक ग्रंथालयावर प्रभाव पडला. ऑपेरा डेल ड्युओमोच्या आर्काइव्हजच्या संग्रहातील ५,५६,००० दस्तऐवजांचे खंड खराब झाले आहेत. गॅबिनेटो व्ह्यूस्यूक्स ग्रंथालयातील सर्व २५०,००० खंड खराब झाले. इटलीमधील फ्लॉरेन्सच्या राष्ट्रीय केंद्रीय ग्रंथालया तील अंदाजे १३,००,००० वस्तूंचे पुरामध्ये नुकसान झाले. पुस्तके, कोरीवकाम, चित्रे, शिल्पे, या सर्व गोष्टी सध्या मातीच्या आणि कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली बसल्या होत्या (लीडेल, २०१९).



**सौजन्य: १९६६ च्या फ्लॉरेन्स पूर नंतरचा एक क्षण (प्रतिमा: डेव्हिड लीस, लाइफ मॅगझिन)**

- २३ सप्टेंबर १९४० च्या पहाटे, ब्रिटिश म्युझियमच्या ईस्ट विंगवर एक बॉम्ब पडला. यामुळे किंग्ज लायब्ररी गॅलरीच्या महत्त्वाच्या भागाचे नुकसान झाले आणि किंग जॉर्ज तिसरा याने संग्रहित केलेली अनेक पुस्तके, पुरातन वास्तू नष्ट झाल्या. १२४ खंड (९६ कामे) गायब झाल्याचा अंदाज आहे, ३०४ खंड (१७० कामे) दुरूस्तीच्या पलीकडे खराब झाले आहेत आणि सुमारे १००० खंड दुरुस्त करण्यायोग्य आहेत (एडवर्ड्स, २०१३).
- महाराष्ट्रातील चिपळूण शहरातील १५६ वर्षे जुन्या ग्रंथालयामध्ये आलेल्या पुरामुळे अनेक पुस्तकांचा, ऐतिहासिक दस्तऐवजांचा आणि कलाकृतींचा नाश झाला.



**सौजन्य: खराब झालेल्या दस्तऐवजासह लोकमान्य ग्रंथालय आणि संग्रहालयाचे कार्याध्यक्ष, एक्सप्रेस**

- १६ ऑगस्ट २०१८ रोजी केरळमध्ये आलेल्या पुरामुळे राज्यातील २२८ पेक्षा जास्त ग्रंथालये उद्ध्वस्त झाली होती. वृत्तानुसार, पुस्तके, फर्निचर आणि इतर उपकरणांचे एकूण १२ कोटींहून अधिक नुकसान झाले आहे.



**पुराच्या वेळी मातीत वाहून गेलेला पुस्तकांचा ढीग**

- तामिळनाडूच्या पुरात पाच ग्रंथालयांमधील ४.५ लाख पुस्तके नष्ट झाली. नगर वाचनालय, हे प्रचलित ग्रंथालयांपैकी एक होते जेथे पाणी ६-७ फुटांपर्यंत वाढले आणि सुमारे १.५ लाख पुस्तके नष्ट झाली.



**सौजन्य: अशोक नगर शाखेतील सार्वजनिक वाचनालयाच्या प्रवेशद्वारावर पुस्तकांचा ढीग. (प्रतिमा: डीसी)**

**१०. ग्रंथालयासाठी उपलब्ध असलेल्या विमा पॉलिसी :**

policybazaar.com. या संकेतस्थळावर दिलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधला असता त्यांच्या प्रतिनिधींकडून 'भारत सुक्ष्म उद्यम सुरक्षा' Fire and Buglary Insurance या अंतर्गत ग्रंथालयांना विमा देता येतो; अशी माहिती प्राप्त झाली. ICICI Lombard, HDFC Ergo, TATA AIG. BAJAJ Allianz, SBI यासारख्या कंपन्या Fire and Buglary Insurance प्रदान करतात. या विम्या अंतर्गत पुढील बाबतीत कव्हरेज दिला जातो.

- हा विमा इमारतीच्या झालेल्या भौतिक नुकसानासाठी संरक्षण प्रदान करतो.
- ग्रंथालयामध्ये आग आणि ज्वलन यांमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी अग्नि विमा संरक्षण प्रदान करते.

- ग्रंथालयीन उपकरणे उदा. पुस्तके, संगणक, प्रिंटर, झेरॉक्स मशीन यासारख्या ग्रंथालयाशी संबंधित इतर मालमत्ता देखील मालमत्ता विम्याच्या अंतर्गत समाविष्ट आहेत.
- बॉम्ब स्फोटामुळे होणारे नुकसान अग्नि विमा पॉलिसी अंतर्गत समाविष्ट आहे.
- भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, वादळे, चक्रीवादळ इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे नुकसान कव्हर केले जाते.
- दंगली, दहशतवाद आणि संपामुळे होणारे नुकसान या विम्याच्या अंतर्गत समाविष्ट आहे.
- आग आणि घरफोडी विमा पॉलिसी अंतर्गत चोरीचे संरक्षण 7 दिवसांच्या आत (दस्तऐवज सबमिशनच्या अधीन) कोणत्याही विमा उतरवलेल्या धोक्याच्या घटनेच्या बाबतीत प्रदान केले जाते.
- पोल, झाडे पडल्यामुळे, पाण्याच्या टाक्या, पाईप्स आणि उपकरणे फुटल्याने होणारे नुकसान देखील इमारत विम्याअंतर्गत संरक्षित केले जाते.
- ग्रंथालयामध्ये चोरी झाल्यास त्यातून जे नुकसान होते त्याची नुकसान भरपाई विमा पॉलिसीच्या अटी व शर्तीनुसार केली जाते.

Fire and Buglary Insurance ही पॉलिसी घेण्यासाठी ग्रंथालयासंबंधित आवश्यक माहिती पुरवावी लागते. हि माहिती पुरविल्यानंतर विमा कंपनी संभाव्य प्रिमिअम ची रक्कम आणि कव्हरेज बद्दल अधिक माहिती देते.

## ११. निष्कर्ष :

ग्रंथालयामध्ये आपली संस्कृती, नीतिमूल्ये जपणारी, सांस्कृतिक, ऐतिहासिक, ज्ञान मिळवून देणारे बरेच वाचनसाहित्य उपलब्ध असते. हे वाचनसाहित्य ग्रंथालयामार्फत एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला सुपूर्त केले जाते. या अशा दुर्मिळ साहित्याचे संरक्षण करण्यासाठी ग्रंथालयीन विमा ग्रंथालयाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्वाचा आहे. ग्रंथालयीन विमा काढल्यामुळे ग्रंथालयातील साहित्याच्या सुरक्षतेची हमी निर्माण होते. अचानक उद्भवलेल्या आपत्तीमुळे ग्रंथालयीन इमारत, ग्रंथालयीन साधनसंपत्ती, उपकरणे, पुस्तके यासारख्या मालमत्तेची मोठ्या प्रमाणात नुकसान होते. ग्रंथालयात उद्भवणाऱ्या समस्या आणि आपत्तींचा विचार ग्रंथपालाने केला पाहिजे. ग्रंथालयाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व्यावसायिक विमा मध्यस्थांकडून तज्ज्ञांचा सल्ला घेणे उचित असते. विमा प्राप्त करण्याची जबाबदारी संस्थेनुसार बदलते. ज्याप्रमाणे ग्रंथालयातील कार्य योग्य प्रकारे चालू असल्याची खात्री करण्याची जबाबदारी ग्रंथालय प्रशासकाची आहे. त्याचप्रमाणे ग्रंथालय प्रशासकांनी ग्रंथालयासंबंधी पुरेसा विमा आहे याची खात्री करणे आवश्यक आहे. ग्रंथालयीन विमा ग्रंथालयांना सुरक्षा प्रदान करते. नुकसान झालेल्या मालमत्तेची नुकसान भरपाईची हमी देते. त्यामुळे ग्रंथालयाचा विमा काढलेला असल्यास अशा आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानाची नुकसान भरपाई विमा कंपनी त्यांच्या अटी व शर्तीनुसार करून देते. त्यामुळे ग्रंथालयाच्या आर्थिक धोरणामध्ये ग्रंथालय विम्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्यासाठी विशेष आर्थिक तरतूद करणे देखील आवश्यक आहे.

**संदर्भसूची :**

*A Pile of Books Which Are Soiled during the Floods*. 10 Sept. 2018, special.ndtv.com/kerala-floods-42/news-detail/kerala-floods-how-floods-damaged-public-libraries-in-kerala-in-pictures-1914454/3#:~:text=in%20a%20library.-,A%20pile%20of%20books%20which%20are%20soiled%20during%20the%20floods,-Locals%20and%20volunteers. Accessed 27 Feb. 2024.

*Books Piled up at the Entrance of the Ashok Nagar Branch Public Library. (Photo: DC) Https://Www.deccanchronicle.com/151217/Nation-Current-Affairs/Article/45-Lakh-Books-Five-Libraries-Destroyed-Tamil-Nadu-Floods*.

Adekanye, E. A. (2011). Insurance Coverage in Nigerian Academic Libraries Insurance Coverage in Nigerian Academic Libraries Insurance Coverage in Nigerian Academic Libraries. Library Philosophy and Practice (E-Journal), 1-6. https://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=1554&context=libphilpracEdwards, Adrian S. "Destroyed, Damaged and Replaced: The Legacy of World War II Bomb Damage in the King's Library ." *Electronic British Library Journal*, 2013.

"How Floods Damaged Public Libraries in Kerala." *Https://Special.ndtv.com/Kerala-Floods-42/*, special.ndtv.com/kerala-floods-42/news-detail/kerala-floods-how-floods-damaged-public-libraries-in-kerala-in-pictures-1914454/3#:~:text=Libraries%20In%20Kerala-. Accessed 27 Feb. 2024.

Lees, David. *A Fraction of the Aftermath of the Florence Flood of 1966* , 5 Apr. 2019, blogs.libraries.indiana.edu/craiglab/2019/04/05/before-the-flood-after-the-flood/#:~:text=A%20fraction%20of%20the%20aftermath%20of%20the%20Florence%20Flood%20of%201966%20(Image%3A%20David%20Lees%2C%20Life%20Magazine%2C%20Fair%20Use)%C2%A0. Accessed 27 Feb. 2024.

Liddell, Chelsea. "Before the Flood, after the Flood." *Libraries Indiana University Bloomington*, 5 Apr. 2019, blogs.libraries.indiana.edu/craiglab/2019/04/05/before-the-flood-after-the-flood/#:~:text=Craig%20Preservation%20Lab-,Before%20the%20Flood%2C%20After%20the%20Flood,-April%205%2C%202019. Accessed 27 Feb. 2024.

Narayanan, Vivek. "4.5 Lakh Books in Five Libraries Destroyed in Tamil Nadu Floods ." *Deccan Chronical*, 17 Dec. 2015, www.deccanchronicle.com/151217/nation-current-

affairs/article/45-lakh-books-five-libraries-destroyed-tamil-nadu-floods. Accessed 27 Feb. 2024.

Sane, Bhagyashree, and Bhakti Beke. *Challenges in Setting up an Insurance Library: Indian Scenario*. 1 Jan. 2001, www.researchgate.net/publication/28809308_Challenges_in_setting_up_an_insurance_library_Indian_scenario#:~:text=Challenges%20in%20setting%20up%20an%20insurance%20library%3A%20Indian%20scenario. Accessed 27 Feb. 2024.

Suryawanshi, Sudhir. "Maharashtra Floods Damage Prized Collection at 156-Year-Old Library." *The New Indian Express*, 2 Aug. 2021, www.newindianexpress.com/nation/2021/Aug/02/maharashtra-floods-damage-prized-collection-at-156-year-old-library-2338862.html#:~:text=Maharashtra%20floods%20damage%20prized%20collection%20at%20156%2Dyear%2Dold%20library. Accessed 27 Feb. 2024.

www.newindianexpress.com/nation/2021/Aug/02/maharashtra-floods-damage-prized-collection-at-156-year-old-library-2338862.html#:~:text=Working%20president%20of%20the%20Lokmanya%20Library%20and%20Museum%20with%20a%20damaged%20document%20%7C%20Express.